# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-९७** **दिनांक - १८/०३/२०२४**

**बँकेची बनावट एन.ओ.सी तयार करुन लोन वरील महागड्या कार परराज्यात विक्री करणाऱ्या अंतरराज्य टोळीला जेरबंद करण्यास आचोळे पोलीसांना आले यश**
**विविध राज्यातुन २,३४,५३,३०२/- किंमतीच्या १२ कार जप्त.**

दिनांक २८/०९/२०२३ रोजी यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली की, त्यांना ऑक्टोबर २०२२ मध्ये आरोपीत याने तो बँकेचा सी.ए आहे अशी ओळख करुन देवुन तो बँकांचे ऑडीट करीत असल्याचे सांगुन फिर्यादी यांचे किराणा दुकानाच्या व्यवसायासाठी २,००,००,०००/- रुपये (२ कोटी) लोन मंजुर करुन देतो असे सांगुन त्यांचे व्यवसायाबाबत माहीती व दुकानाची कागदपत्र, घेवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचे त्यांचेकडुन विविध बँकेमध्ये कर्ज मंजुर करण्यासाठी त्यांचे बँक ॲप्लीकेशन फॉर्म भरुन घेवुन ती कागदपत्र महागड्या कार खरेदी करण्यासाठी बँकेमध्ये जमा करुन फिर्यादी व त्यांच्या पत्नीच्या नावे महागड्या कंपनीच्या कार खरेदी करुन त्यावर बनावट कागदपत्र व बनावट मेल द्वारे बँकेंचे वेग वेगळ्या बँकेचे कर्ज मंजुर करुन सदरच्या कार फिर्यादी यांचे ताब्यात न देता त्यांची एकुण २,८४,४९,०००/- रुपये इतक्या रक्कमेची फसवणुक केल्या बाबत आचोळे पोलीस ठाणे, गु.र.नं-४६९/२०२३ भादवि कलम ४०६,४२०,४६५,४६७,४७१,१२०(ब) प्रमाणे दि.२८/०९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे महागड्या कार खरेदी करुन २,८४,४९,०००/-रुपये रक्कमेची फसवणुक झालेबाबत गुन्हा नोंद झाल्यानंतर तसेच फसवणुक करणारी अंतरराज्य टोळी असण्याची शक्यता असल्याने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणुन आरोपी यांना अटक करण्याबाबत मा.वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली नमुद आरोपी यांचा शोध घेणेबाबत गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी अंमलदार हे गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे पाहिजे आरोपी यांचा शोध घेत होते.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे **राहुल गिरीश शहा** हा त्याचे स्वत:चे अस्तित्व लपवुन पुरावे नष्ठ करुन बनावट आधार कार्ड व त्यावर स्वत:चे नाव बदलुन कर्नाटक, पश्चिम बंगाल, दिल्ली व नेपाळ अश्या वेग वेगळ्या राज्यातील आलिशान हॉटेलमध्ये वास्तव्य करीता होता. त्यामुळे नमुद आरोपी मिळुन येत नव्हता. करीता आरोपी याचे विरुध्द पुरावे प्राप्त करुन तांत्रीक विश्लेशनाद्वारे शोध घेत असताना नमुद आरोपी हा हॉटेल मेलुहा “द” फर्न, पवई मुंबई या हॉटेलमध्ये वास्तव्य करीत असल्याबाबत खात्रीशिर

माहिती प्राप्त झाली. करीता नमुद आरोपी याचा सदर हॉटेलमध्ये जावुन शोध घेतला असता तो **सुरेश गोपाळ भगत** या नावाचे बनावट आधारकार्ड देवुन वस्तव्य करीत असल्याचे निष्पन्न झाले. नमुद आरोपी

यास सदर हॉटेलमधुन ताब्यातुन घेवुन त्यांना सदर गुन्ह्यात दि.०३/०२/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी याचे ताब्यात वेगवेगळ्या व्यक्तीच्या नावे असलेली ०८ सिमकार्ड, १ नेपाळ देशाचे सिम कार्ड, ०२ लॅपटॉप, ०१ आय पॅड, ०९ मोबाईल व ०३ बनावट नावची आधार कार्ड असा एकुण ३,३४,०००/- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला आहे. त्याचबरोबर नमुद अटक आरोपी यांचेकडे फेडरल बँक व टि.एन.बी या बँकेच्या बनावट एन.ओ.सी मिळुन आल्या आहेत.

तपासादरम्यान यातील आरोपी हे फिर्यादी यांना माझी बँकेमध्ये चांगली ओळख आहे असे भासवुन मी तुमचे लोन करुन देतो असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडुन लोन संदर्भात लागणारी कागदपत्र प्राप्त करुन सदरची कागदपत्र सुमारे १० ते १५ बँकेमध्ये जमा करुन फिर्यादी यांचे बनावट ईमेल आय.डी तयार करुन त्या आधारे फिर्यादी यांच्या नावे परस्पर महागड्या कंपनीच्या कार खरेदी करुन सदरच्या कार खरेदी करण्यासाठी फिर्यादी यांचा बनावट पत्ता नमुद करुन त्यावर कारचे आर.सी बुक प्राप्त करुन तसेच नमुद कारवर असलेल्या लोन कमी झाले असल्याचे संबधीत बँकेची बनावट एन.ओ.सी तयार करुन ती आर.टी.ओ यांना सादर करुन त्या कार परराज्यात विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नमुद गुन्ह्यात आरोपी नामे (१) **राहुल ऊर्फ सचिन ऊर्फ सौरभ गिरीष शहा वय-४१ वर्षे रा.रु नं-३/ए/१४०४, समर्थ को.ऑ.ऑ.हौ.सोसा. मिलत नगरच्या समोर, ओशिवरा, अंधेरी पश्चिम, मुंबई ५३** यास अटक करुन त्याचे अटकेदरम्यान आरोपी नामे (२)**विजय सुरजमनी सिंग वय-४९ वर्षे, व्यवसाय-रियल ईस्टेट एजन्ट, रा.रु.नं- १०१, धनेशकृपा को.हौ.सो. वर्सेत विहार, म्हाडा, ठाणे पश्चिम ता.जि.ठाणे (३)भिकाजी ऊर्फ उमेश बबन गोपाळे, रा.रु नं-२१०, पि-१ बिल्डींग, स्वप्न नगरी, चाकण, पुणे, मुळ रा. मु.पो.आडगाव, ता.खेड राजगुरु नगर, जि.पुणे (४)मोहम्मद नजर मो.जाफर खान वय-४० वर्षे व्यवसाय-झोमॅटो डिलीव्हरी रा.१६,नजर मंझील, आमवाली, मस्जिदजवळ जहॉगिंराबाद, भोपाल राज्य-मध्यप्रदेश (५) प्रविण ऊर्फ राणु हुकूमचंद जैन वय-३४ वर्षे, व्यवसाय-खरेदी विक्री, रा.रु नं-१०३,सुप्रिम ब्लोज, सेक्टर नं-०२,चारकोप गावं,मुंबई मुळ रा.मुळ रा.१/१,क्लब पार्क,जुना बस स्टॅन्ड,ता.गंज बासुदा,जि.विदीशा राज्य-मध्यप्रदेश (६)आकाश धोंडीभाऊ मुसळे वय-२५ वर्षे, व्यवसाय-नोकरी रा.रुनं-०१, बावकर निवास, शिव गल्ली, वर्सोवा, अधेंरी पश्चिम, मुंबई (७) विवेक रामदास करंडे वय-२५ वर्षे, व्यवसाय-नोकरी रा.जोसेफ पटील वाडी, सात बंगला, आराम नगर-१, आंधेरी पश्चिम, मुंबई** असे एकुण ०७ आरोपींना अटक करुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्यांचे ताब्यातुन खालील वर्णनाच्या व २,३४,५३,३०२/- रुपये किंमतीच्या एकुण १२ महागड्या कार जप्त करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र | मॅडेल नं | गाडी नंबर | किंमत |
|---|---|---|---|
| १. | **BMW 20d** | **NOT REGISTERED** | **56,00,000/-** |
| २. | **MAHINDRA XUV-300** | **GJ-06-PK- 9107** | **15,00,000/-** |
| ३. | **MAHINDRA THAR** | **GJ-06-PL-1323** | **15,00,000/-** |
| ४. | **TOYOTA URBAN CRUSER** | **MH 48 CK 4467** | **19,00,000/-** |
| ५. | **MAHINDRA THAR** | **NOT REGISTERED** | **15,40,000/-** |
| ६. | **MAHINDRA THAR** | **GJ-06PK-9320** | **15,40,000/-** |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | **HYUNDAI I 10** | **24BH7249A** | **5,50,000/-** |
| ८. | **HYUNDAI KONA** | **MH 02 FU 3162** | **17,00,000/-** |
| ९. | **MAHINDRA THAR** | **MH 03 EF 2468,** | **15,00,000/-** |
| १०. | **KIA SELTOS** | **23 BH 9551 M** | **24,00,000/-** |
| ११. | **HYUNDAI CRETA** | **23 BH 6057 G** | **20,42,000/-** |
| १२. | **MAHINDRA SCORPIO** | **23 BH 3660 G** | **16,81,302/-** |
| | | | **TOTAL = 2,34,53,302** |

**वरील प्रमाणे अटक आरोपी यांचेकडुन एकुण २,३७,८७,३०२/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्ह्याची यशस्वी उकल केली आहे.**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे | गु.र.नं. ४६९/२०२३ भादविस कलम ४०६,४२०,४६५,४६७,४७१,१२०(ब) |
| २. | आचोळे | गु.र.नं. ७२/२०२४ भा.द.वि.सं कलम ४०६,४२०,१२०(ब) |
| ३. | वडोदरा, गुजरात | गु.र.नं. १११९६०१०२०००५५/२०२० भादविस कलम ४०६,४२०,४६५, ४६७,४७१,१२०(ब) |
| ४. | अंकलेश्वर, गुजरात | गु.र.नं. १११९९००४२३०/२०२० भादविस कलम ४०६,४२०,५०६(२), १२०(ब) |
| ५. | शिळ डायघर, ठाणे | गु.र.नं.१७५/२०२१ भादवि कलम ४०६,३४ प्रमाणे |

नमुद गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार आरोपी नामे **राहुल ऊर्फ सचिन गिरीष शहा** याचा गुन्हे अभिलेख तपासला असता त्याचेवर यापुर्वी विविध राज्यात खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | वडोदरा, गुजरात | गु.र.नं. १११९६०१०२०००५५/२०२० भादविस कलम ४०६, ४२०,४६५,४६७,४७१,१२०(ब) |
| २. | अंकलेश्वर, गुजरात | गु.र.नं. १११९९००४२३०/२०२० भादविस कलम ४०६,४२०, ५०६(२),१२०(ब) |
| ३. | ओशिवरा,मुंबई शहर | गु.र.नं.५४/२०१६ भादविस कलम ४६५,४६७,४६८,४७१,४२० |
| ४. | ओशिवरा, मुंबई शहर | गु.र.नं.१३०/२०१६ भादविस कलम ४६५,४६७,४६८,४७१, ४२०, ४७२,३४ |
| ५. | CBI EOW | गु.र.नं. ०४/२०१२ भादविस कलम ४२०,४६७,४६८,४७१ |
| ६. | कांजुर मार्ग, | गु.र.नं. २०/२००८ भादविस कलम ४२०,४६५,४६८,३४ |
| ७. | ओशिवरा,मुंबई शहर | गु.र.नं. ५१/२००८ भादविस कलम ४६५,४६७,४६८,४७१, ४२०,४०६,३४ |
| ८. | जोगेश्वरी, मुंबई शहर | गु.र.नं. ५१/२००८ भादविस कलम ४६५,४६७,४६८,४७१, ४२०,४०६,३४ |
| ९. | जोगेश्वरी, मुंबई शहर | गु.र.नं. ४९/२००७ भादविस कलम ४२०,४६५,४६८,४२० |
| १०. | बोरीवली, मुंबई शहर | गु.र.नं. ०२/२००७ भादविस कलम ४०६,४२० |
| ११. | सायन,मुंबई शहर | गु.र.नं.१०६/२००७ भादविस कलम ४२०,४६५,४७१,३४ |
| १२. | बांद्रा,मुंबई शहर | गु.र.नं. ५३/२००७ भादविस कलम ४२०,४६५,४६७,४६८, ४७१,१३८,३४ |

सदरची कामगिरी मा.श्री.मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, मा.श्री श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो, मा.श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ- २, मा.श्री.उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.बाळासाहेब पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे,पोनि/विवेक सोनवणे, (गुन्हे),पोनि/विजय चव्हाण, तपास पथकाचे सपोनि/यशपाल सुर्यवंशी, पोउनि/सुहास म्हात्रे, पोहवा/दत्तात्रय दाईंगडे, पोहवा/शंकर शिंदे, पोअं/निखील चव्हाण, पोअं/विनायक कचरे, पोअं/अमोल सांगळे, पोअं/मोहनदास बंडगर, पोअं/मनोज पाईकराव, पोअं/अमोल बरडे, नेम.पो.उ.आयु कार्या. परि २ वसई यांनी यशस्वी रित्या केलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/यशपाल सुर्यवंशी हे करीत आहेत.

------////------